CNR No. MHPA06-0013792020
संक्षिप्त फौजदारी खटला क. ६७२/२०२०

**न्यायदंडाधिकारी प्र.श्रे. न्यायालय कं. ०१ यांच्या न्यायालयात चालविलेल्या संक्षिप्त संपरिक्षेमधील अभिलेख.**

**संक्षिप्त खटल्याचा अ.क. ६७२/२०२०** **निशाणी क. ०२**

| | | |
|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | : ०५/०३/२०२० |
| २. | अहवाल किंवा फिर्यादीचा दिनांक | : ०५/०३/२०२० |
| ३. | फिर्यादीचे नाव | : रमेश नामदेव ठोके,<br>पो.कॉ. ४५६,<br>शहर वाहतूक शाखा, हिंगोली |
| ४ | आरोपीचे नांव : | : सयद अक्रम सयद युसूफ,<br>वय : ३२ वर्षे, धंदा : मजुरी,<br>रा. मस्तान शाह नगर हिंगोली, ता.जि. हिंगोली |

५. **गुन्हयाचे विवरण**

दिनांक ०५/०३/२०२० रोजी १२:०० वाजताचे सुमारास हिंगोली शहरात बस स्टॅड समोर सार्वजनिक रस्त्यावर आरोपीने त्याच्या ताब्यातील ॲटो नोंदणी क्रमांक एम.एच. २६/एके.—४२१५ हा रोडच्या मध्यभागी उभा करून रहदारीस अडथळा केला व भा.दं.वि. २८३ अन्वये शिक्षापात्र असलेला आणि माझे दखलक्षेत्रात येणारा गुन्हा केला.

(अपराधाचा तपशिल आरोपीला समजेल अशा भाषेत वाचुन व समजावुन सांगितला.)

(व्हि.व्हि.निवघेकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्यायालय कं. १, हिंगोली.

दिनांक : १२/०३/२०२२.

**आरोपीचे प्रतिकथन:—**

प्रश्न क्र. १ : आपणास खटल्याच्या कागदपत्राच्या नक्कला मिळाल्या काय ?
उत्तर : .होय.
प्रश्न क्र. २ : आपणास वाचुन व समजावुन सांगितलेला दोषारोप समजला काय ?
उत्तर : होय.
प्रश्न क्र. ३ : तुम्हाला गुन्हा कबुल आहे का किंवा काही बचाव द्यावयाचा आहे काय?
उत्तर : मला गुन्हा कबूल आहे.

आरोपीची सही/अंगठा —————

(व्हि.व्हि.निवघेकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्यायालय क्र.०१, हिंगोली

दिनांक : १२/०३/२०२२.

CNR No. MHPA06-0013792020
**संक्षिप्त फौजदारी खटला क. ६७२/२०२०**

# न्यायनिर्णय
**( घोषीत दिनांक १२/०३/२०२२. )**

१. आज रोजी आरोपी न्यायालया समक्ष हजर झाला व त्याने गुन्हा कबूल असल्याचे सांगितले.

२. आरोपीचे व सरकारी वकिलांचे म्हणणे ऐकले. आरोपीने तो गरीब असून सदरचा गुन्हा हा त्याचा पहिलाच गुन्हा आहे. त्यामुळे त्याने कमीत कमी शिक्षा करण्याची विनंती केली. गुन्हयाचे स्वरूप, आरोपीचे म्हणणे व सरकारी वकिलांनी कथन केलेल्या बाबीं या सर्वांचा विचार करून मी खालील प्रमाणे आदेश पारित करतो.

## आदेश

आरोपीस भारतीय दंड विधानाचे कलम २८३ अन्वये दोषी धरण्यात येते. आरोपीने रू.२००/— (अक्षरी दोनशे रूपये फक्त) दंड भरावा अन्यथा दंड न भरल्यास ०२ दिवस साधा कारावासाची शिक्षा भोगावी.

VIVEK VITHALRAO NIVGHEKAR
Digitally signed by VIVEK VITHALRAO NIVGHEKAR
Date: 2022.03.15 11:36:16 +0530

(व्हि.व्हि.निवघेकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्यायालय क्र. १, हिंगोली.

दिनांक : १२/०३/२०२२.